# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
# MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK
(An ISO 9001:2008 Certified University)
दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक-४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik-422004
Tel : (0253) 2539292, Fax : (0253) 2539295
Website : www.muhs.ac.in, E-mail : registrar@muhs.ac.in

डॉ. काशिनाथ दा. गर्कळ
पीएच्.डी.
कुलसचिव

**Dr. Kashinath D. Garkal**
Ph.D.
**Registrar**


क्रं.मआविवि/मुंका/कार्यशाळा/ /२०१४ दि.:- २७/११/२०१४

प्रति,
मा. उपसचिव, (राजशिष्ठाचार)
सामान्य प्रशासन विभाग,
नविन प्रशासकीय इमारतीजवळ, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२

विषय : दि. ०२.१२.२०१४ (मंगळवार) सहयाद्री अतिथीगृहाचे यशवंतराव चव्हाण सभागृह उपलब्ध करुन देण्याबाबत...

महोदय,

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक, युनीसेफ (UNICEF, GINEVA), संचालक वैद्यकिय शिक्षण व संशोधन मुंबई यांचे संयुक्त विद्यमाने केंद्रशासन व महाराष्ट्र शासनाच्या कुपोषण नियंत्रण या उपक्रमाविषयी जागृती तसेच परीचारीकांना प्रशिक्षित करणेकरीता दि.०२.१२.२०१४ (मंगळवार) रोजी "कुपोषण" या विषयावरील कार्यशाळा आयोजीत करण्यात येणार आहे.

सदर कार्यशाळेकरीता वैद्यकिय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिपत्याखाली रुग्णालये महाविद्यालयात "PSM, OBGY & Paediatrics विभागात कार्यरत असलेल्या परिचारीकांना प्रशिक्षणाकरीता निमंत्रित करण्यात येणार आहे.

सदर कार्यशाळा सहयाद्री अतिथीगृह मलबार हील मुंबई येथे आयोजित करण्याचा मानस असुन या कार्यक्रमाकरीता अंदाजे १२० नामांकित व्यक्ती उपस्थित राहण्याची शक्यता आहे. आपणास विनंती करण्यात येते की, सहयाद्री अतिथीगृहातील यशवंतराव चव्हाण सभागृह दि.०२/१२/२०१४ (मंगळवार) रोजी उपलब्ध करुन दयावे. उपरोक्त कार्यशाळेच्या आयोजनाच्या तसेच आदरतिथ्यचा खर्च विद्यापीठाच्या मुंबई विभागीय कार्यालयाद्वारा अदा करण्यात येईल.

धन्यवाद.

कुलसचिव

प्रत माहितीस्तव तथा योग्य त्या कार्यवाहीसाठी:

१) मा.व्यवस्थापक, सहयाद्री अतिथी गृह, मलबार हिल, मुंबई यांना अग्रेषित.- आपणास विनंती करण्यात येते की सभागृह आरक्षणाबाबत या कार्यालयास अवगत करण्यात यावे.
२) मा. कुलगुरु कार्यालय, म.आ.वि.वि. नाशिक.
३) संसर्गजन्य रोग विभाग, मुंबई
४) आंतरविद्याशाखा व संशोधन विभाग म.आ.वि.वि नाशिक.
५) शैक्षणिक विभाग (पदवी) म.आ.वि.वि नाशिक.